# प्रेसनोट

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अकोला
दिनांक:— २३/०५/२०२५

| | | |
|---|---|---|
| १ | युनिट चे नाव | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अकोला घटक |
| २ | आरोपीचे नाव, हुद्दा व कार्यालयाचा पत्ता | आरोपी श्री. गजानन देवचंद माळी, वय—५६ वर्ष, पद— सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक, बक्कल नंबर ६२४, नेमणुक— स्थानिक गुन्हे शाखा, पोलीस अधीक्षक कार्यालय, बुलढाणा, रा. धामणगांव बढे ता. मोताळा जि. बुलढाणा, ह.मु. श्री. कोलते यांचे घरी किरायाने गणेशनगर, बुलढाणा ता.जि. बुलढाणा |
| ३ | घटना तारीख वेळ | दिनांक २३.०५.२०२५ चे १७.४८ ते १८.०३ वा. |
| ४ | मागणी केलेली लाच रक्कम | रू. १४,०००/— तडजोडीअंती |
| ५ | स्विकारलेली लाच रक्कम | रू. १४,०००/— तडजोडीअंती |
| ६ | घटनास्थळ | शिवनेरी ढाबा, मुंदडा पेट्रोलपंपाजवळ, मलकापूर—नांदुरा रोड, मलकापूर जि. बुलढाणा |

थोडक्यात हकिगत :— यातील तक्रारदार हे रेती वाहतुकीचा व्यवसाय करीत आहेत. यातील लोकसेवक हे तक्रारदार यास त्यांच्या ताब्यातील टिप्परने रेती वाहतुकीचा व्यवसाय सुरू ठेवण्याकरीता माहे एप्रील व मे महिन्याचे प्रत्येकी रू. ८०००/— असे एकुण रू. १६,०००/— लाच रकमेची मागणी केली. परंतु तक्रारदारास आरोपी लोकसेवकाने मागणी केलेली लाच रक्कम देण्याची मुळीच इच्छा नसल्याने त्यांनी लोकसेवक गजानन माळी यांचेविरूध्द कार्यवाही करण्याकरीता ला.प्र.वि. अकोला घटकाकडे दिनांक १३.०५.२०२५ रोजी तक्रार नोंदविली.

सदर तक्रारीवरुन दिनांक १३.०५.२०२५ रोजी शिवनेरी ढाबा, मुंदडा पेट्रोलपंपाजवळ, मलकापूर—नांदुरा रोड, मलकापूर जि. बुलढाणा येथे लाच मागणी पडताळणी करण्यात आली. सदर लाच मागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान श्री. गजानन माळी, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक यांनी तक्रारदाराकडे पंचासमक्ष तडजोडीअंती रू. १४,०००/— लाच रकमेची मागणी केली.

त्यानंतर आज दिनांक २३.०५.२०२५ रोजी शिवनेरी ढाबा, मुंदडा पेट्रोलपंपाजवळ, मलकापूर—नांदुरा रोड, मलकापूर जि. बुलढाणा येथे रचण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान श्री. गजानन देवचंद माळी, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक यांनी तक्रारदाराकडे मागणी केलेली लाच रक्कम रू. १४,०००/— शिवनेरी ढाबाच्या काऊंटरवर पंचासमक्ष स्विकारली. त्यावरून नमुद आरोपीस लाच रक्कमेसह ताब्यात घेण्यात आलेले असुन पोलीस स्टेशन मलकापूर (शहर) जि. बुलढाणा येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कार्यवाही मा. श्री. मारुती जगताप, पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती, मा. श्री. सचिंद्र शिंदे, अपर पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांचे मार्गदर्शनात सापळा अधिकारी श्री. मिलिंदकुमार बहाकर, पोलीस उपअधिक्षक, पोलीस अंमलदार प्रदिप गावंडे, दिगांबर जाधव, संदिप ताले, असलम शहा सर्व ला.प्र.वि. अकोला यांनी पार पाडली.

तरी सर्व नागरीकांना आव्हान करण्यात येते कि कोणत्याही शासकीय अधिकारी/कर्मचारी अथवा त्यांच्यावतीने कोणत्याही खाजगी इसमाने त्यांचे कोणतही शासकीय काम करून देण्यासाठी लाचेची मागणी केल्यास तात्काळ अँन्टी करप्शन ब्युरो, अकोला येथील खालील क्रमांवर संपर्क साधावा.

**ऑफिस फोन नं. ०७२४—२४१५३७०, टोल फ्रि कं. १०६४**

अँन्टी करप्शन ब्युरो अकोला

(मिलींदकुमार अ. बहाकर)
पोलीस उपअधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अकोला